महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक साअयो-२००३/प्रक्र.१५९/विसयो,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : ३१ मे, २००४.

**शासन परिपत्रक :**

या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक साअयो-२००३/प्र.क्र.१५९/विसयो, दिनांक १४ जानेवारी, २००४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सोलापूर, यांनी त्यांच्या पत्र क्रमाक संगायो/१९/आरआर/१७२/०४, दिनांक २३ मार्च २००४ अन्वये महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे की, या विभागाच्या दिनांक १८ मार्च २००४ च्या पत्रामध्ये जो शब्द वापरला गेला आहे की, " या तीनही योजना अंमलात आणण्यासाठी व्यक्ती दारिद्रय रेषेखाली असावयास पाहिजे ही अट कायम आहे. परंतु ज्यांचे आर्थिक उत्पन्न दारिद्रय रेषेकरिता ठरवून दिलेल्या रु. १५०००/- मध्ये बसत आहे अशा लाभार्थ्यांचे मूळ दारिद्रय रेषेखालील यादीत नाव समाविष्ट नाही असे लाभार्थी समूह या योजनेपासून वंचित रहू नयेत म्हणून कोणती खबरदारी घेण्यात यावी याबाबत मार्गदर्शन व्हावे." याअनुषंगाने उपरोक्त दिनांक १४ जानेवारी २००४ च्या शासन निर्णयामध्ये उत्पन्न मिळकतीचा दाखला याकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे आणि उत्पन्न मिळकतीचा दाखला म्हणजे तहसीलदार/नायब तहसीलदार किंवा मंडळ निरीक्षक यांनी तलाठी/ग्रामसेवक यांच्या शिफारशीवरुन दिलेला दाखला किंवा दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये त्या व्यक्ती/कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा आहे. याचबरोबर उपरोक्त शासन निर्णयामध्ये हेही उल्लेखित करण्यात आले आहे की, वरील तीनही योजनांसाठी निराधाराची व्याख्या खालीलप्रमाणे राहील :

ज्या व्यक्तीचे किंवा त्या व्यक्तीच्या कुटुंबाचे उत्पन्न, स्थावर/जंगम मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न किंवा नातेवाईक वा सज्ञान मुलाकडून मिळत असलेली मदत असे सर्व एकत्रित करुन त्यांचे कायम स्वरुपी चरितार्थ चालविण्याकरिता पुरेसे उत्पन्न नसल्यास अशा व्यक्तीस/कुटुंबास निराधार समजण्यात यावे. चरितार्थ चालविण्यासाठी त्या व्यक्तीच्या कुटुंबाचे एकूण उत्पन्न दारिद्रय रेषेखालील यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी आवश्यक असलेली शहरी व ग्रामीण भागातील केंद्र शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंत असावे.

२. वर उल्लेखित शासन निर्णयात जो शब्दप्रयोग झालेला आहे तो सुस्पष्ट आहे की, व्यक्ती किंवा परिवार याला निराधाराच्या परिभाषेमध्ये आणण्याकरिता त्याची एकूण उत्पन्न मर्यादा दारिद्रय रेषेकरिता शहरी किंवा ग्रामीण भागाकरिता असलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नसावी पण त्याचे नाव दारिद्रय रेषेखालील

२५६(४-४
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

यादीत असले पाहिजे हे आवश्यक नाही. कारण दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव घालण्याकरिता लांबलचक प्रक्रियेतून जावे लागते. त्याला वेळ लागतो आणि दरम्यानचे काळात खरोखर निराधार व्यक्ती/कुटुंबाला राज्याचे अर्थसहाय्य मिळत नाही. या विभागाचे पत्र क्रमांक संगायो २००४/प्रक्र.४४/विसयो, दिनांक १९ मार्च, २००४ या पत्राद्वारे मागे घेण्यात येत आहे.

३. शासन निर्णय क्रमांक साआयो-२००३/प्र.क्र.१५९/विसयो, दिनांक १४ जानेवारी २००४ पृष्ठ २ वरील परिच्छेद २ इंदिरा गांधी निराधार व भुमिहिन शेतमजूर महिला अनुदान योजना या शीर्षकांतर्गत ' किंवा जास्तीत जास्त दोन वर्षापर्यन्त ' हे शब्द वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२१/५/०४

( डॉ. मुन्शिलाल गौतम )
शासनाचे प्रधान सचिव.